| | |
|---|---|
| | दाखल दिनांक –१७.०१.२०२२ |
| | नोंदणी दिनांक –१७.०१.२०२२ |
| | निकाल दिनांक–२७.०८.२०२६ |
| | कालावधी– ०४ वर्ष ०७ महिना १० दिवस. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पन्हाळा यांच्या न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी श्री. के.दि.काकतकर)**

**नियमित फौजदारी खटला क्र. १८/२०२२** **नि.३९/ब**

**गु.र.नं. ११६/२०२१ कोडोली पोलिस ठाणे**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>कोडोली पोलीस ठाणे, ता. पन्हाळा , जि. कोल्हापूर. |
| सहा.सरकारी अभियोक्ता | श्रीमती. एस. एस.गर्जे |
| आरोपी | संजय दादू खोत,<br>व.व. ३०,व्यवसाय – शेती<br>सर्व रा. माले, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. सचिन लोखंडे |

**भाग – ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १६.०६.२०२१ |
| पहिली खबर दिनांक | २२.०६.२०२१ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | १७.०१.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १६.०९.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १७.०२.२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | **२७.०८.२०२६** |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निरंक |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनवार सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष/ शिक्षा | जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| संजय दादू खोत | निरंक | निरंक | भा.दं.वि.क.२७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे. | निर्दोष | निरंक |

**भाग–क**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष न्यायालयामार्फत तपासले साक्षीदार यादी**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | जालिंदर गणपती खुटाळे | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | नामदेव तुकाराम खुटाळे | साक्षीदार |
| अ.सा.क्र.३ | सागर बजरंग पवार | तपासिक अंमलदार |

**ब.बचाव पक्षाचे साक्षीदार व क. कोर्ट साक्षीदार**

**.......... निरंक............**

**अभियोग पक्षाचे दिलेले निशाणी**

**अ.अभियोग,**

| निशाणी | कागदाचे वर्णन |
|---|---|
| २१ | फिर्याद |
| २२ | प्रथमवर्दी |
| ३३ | लेखी आदेश |
| ३४ | विमा पत्र |

१७/८/२६

**ब .बचाव पक्ष**

.......... **निरंक**............

**क. न्यायालयामार्फत दिलेले निशाणी**

| निशाणी | कागदाचे वर्णन |
|---|---|
| ९ | दोषारोप पत्र |
| १० | दोषारोप |
| ११ | आरोपीचे जबाब |
| २० | साक्षीदार क्र.१ यांची साक्ष |
| २३ | घटनास्थळ पंचनामा |
| २४ | एम.एल सी फॉर्म |
| २५ | जखमी वर्दी |
| २६ | मरणोत्तर पंचनामा |
| २७ | पोलीस अहवाल |
| २८ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| २९ | आर.टी.ओ अहवाल |
| ३० | साक्षीदार क्र.२ यांची साक्ष |
| २१ | फिर्याद |
| २२ | प्रथमवर्दी |
| ३२ | साक्षीदार क्र.३ यांची साक्ष |
| ३३ | लेखी आदेश |
| ३४ | विमा पत्र |
| ३८ | आरोपी याचा कलम ३१३ प्रमाणे जबाब |

**ड. मुद्देमाल ... ..**

**निरंक.**

27/8/26

# न्यायनिर्णय

## ( जाहीर दि. २७.०८.२०२६)

०१. आरोपी हा भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४-अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी संपरीक्षाविधीन आहेत.

०२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे:-**

दि.१६.०६.२०२१ रोजी फिर्यादी यांचा भाऊ पांडुरंग व त्यांचा चुलत भाऊ संजय दादू खोत असे फिर्यादी यांची होंडा शाईन मोटरसायकल क्रमांक एम.एच.४६ बीएच ०५४८ यावरून कोल्हापूर येथे शेतीच्या कामाकरिता गेले होते, तेथे काम झाल्यानंतर पांडुरंग व संजय हे दोघेही सातवे या गावी गेले, सातवे या गावी गेल्यानंतर तेथे थोडावेळ थांबून ते दोघेही बोरपाडळे मार्गे घरी खुटाळवाडी येथे येत होते, आरोपी त्यावेळी भरधाव वेगाने चालवत होता. गाडीवर पाठीमागे त्यांचा भाऊ पांडुरंग गणपती खुटाळे बसला होता, त्यावेळी पाऊस पडत होता. दोघेही गाडीवरून भरधाव वेगाने घरी येत असताना सायंकाळी ०७.३० वाजण्याच्या सुमारास आवळी गावाचे अलीकडे आल्यावर आरोपीचा गाडीवरील ताबा सुटला व मोटरसायकलला ब्रेक मारल्यामुळे मोटारसायकल स्लीप होऊन ते दोघेही मोटरसायकल सह रोडवर पडले, त्यावेळी आरोपी याच्या डोक्याला व डाव्या पायास खरचटले. तर पांडुरंग यांच्या डोक्याच्या डाव्या बाजूला जोराचा मुका मार बसून ते जागीच बेशुद्ध झाले, त्यावेळी फिर्यादी व जमलेल्या लोकांनी आरोपी व पांडुरंग यांना दवाखान्यात दाखल केले, त्यावेळी पांडुरंग यांच्या डोक्याचे ऑपरेशन करण्यात आले. मात्र तरीदेखील उपचार चालू असताना कोल्हापूर येथे पांडुरंग खुटाळे यांचे निधन झाले. त्यामुळे फिर्यादीने कोडोली पोलीस ठाण्यात प्रथमवर्दी दिलेली आहे.

०३. फिर्यादीने दिलेल्या प्रथमवर्दीच्या आधारे आरोपीविरुद्ध गुन्हा क्र. ११६/२०२१ भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४-अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये नोंदवण्यात आला. प्रस्तुत प्रकरणाचा तपास तपासी अधिकारी सागर बजरंग पवार यांनी केला. तपासकामी त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले,

घटनास्थळाचा पंचनामा केला व तपास पुर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपी यांचे विरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दोषारोप निशाणी १० प्रमाणे निश्चित केला होता. आरोपी यास दोषारोप मराठीत वाचून दाखवून व समजावून सांगीतला, आरोपीने त्यास नकार देऊन संपरीक्षेची मागणी केली. नि. १९ येथे आरोपी व फिर्यादी यांनी तडजोड पुरसीस सादर केली. तसेच अभियोग पक्ष पुरावा आणू न शकल्यामुळे पुरावा बंद आदेश पारीत करणेत आला. आरोपीविरुद्ध दोषारोप सिद्ध होणेइतपत पुरावा असल्यामुळे आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचा जबाब नि. ३८ येथे नोंदविण्यात आला.

०५. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती. एस. एस. गर्जे आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. सचिन लोखंडे यांचा युक्तीवाद ऐकला. निर्णयाच्या दृष्टीने खालील मुद्दे उपस्थित होतात. मुद्यांवरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी याने त्याचे ताब्यातील होंडा शाईन कंपनीची क्र. एम एच ४६ बीएच ०५४८ ही मानवी जीवन धोक्यात येईल व मयत पांडुरंग खुटाळे यांना दुखापत पोहोचेल अशा रीतीने सार्वजनिक रस्त्यावर हयगयीने व बेदरकारपणे चालविल्याचे सरकार पक्ष सिद्ध करतो का ? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २. | आरोपी याने त्याचे ताब्यातील होंडा शाईन कंपनीची क्र. एम एच ४६ बीएच ०५४८ ही हयगयीने व बेदरकारपणे चालवून त्याच्या गाडीवर पाठीमागे बसलेल्या पांडुरंग खुटाळे यांचा मृत्यू केल्याचे सरकार पक्ष सिद्ध करतो का ? | **नकारार्थी.** |
| ३. | आरोपी याने त्याचे ताब्यातील होंडा शाईन कंपनीची क्र. एम एच ४६ बीएच ०५४८ ही जखमी पांडुरंग खुटाळे यांना दुखापत पोहोचेल अशा रीतीने हयगयीने व बेदरकारपणे चालविल्याचे सरकार पक्ष सिद्ध करतो का ? | **नकारार्थी.** |
| ४. | आरोपी याने त्याचे ताब्यातील होंडा शाईन कंपनीची क्र. एम एच ४६ बीएच ०५४८ ही जखमी पांडुरंग खुटाळे यांना गंभीर दुखापत पोहोचेल अशा रीतीने हयगयीने व बेदरकारपणे चालविल्याचे सरकार पक्ष सिद्ध करतो का ? | **नकारार्थी.** |
| ५. | आरोपी याने त्याचे ताब्यातील होंडा शाईन कंपनीची क्र. एम एच ४६ बीएच ०५४८ हे वाहन जागेचे स्वरूप, स्थिती व उपयोग आणि त्यावेळी असलेल्या वाहतुकीचे प्रमाण अशी सर्व परिस्थिती लक्षात घेता मानवी जीवन धोक्यात येईल अशा रीतीने हयगयीने व बेदरकारपणे चालविल्याचे तसेच सरकार पक्ष सिद्ध करतो का ? | **नकारार्थी.** |
| ६. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.** |

8/26

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ५ करिता :-**

०६. कारणांचा उहापोह करणे सोपे जावे म्हणून मुद्दा क्र.१ ते ५ हे एकत्रितरित्या घेण्यात येत आहेत. आरोपीविरुद्धचे दोषारोप शाबित करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार जालिंदर गणपती खुटाळे (सा.क्र.१) याची साक्ष निशाणी २० प्रमाणे नोंदविली. सदर साक्षीदार हा फिर्यादी आहे. सदर साक्षीदाराने सरतपासात पांडुरंग गणपती खुटाळे हे त्यांचे भाऊ आहेत, त्यांचे भाउ आरोपी याच्या गाडीवरून पडले होते, सदर अपघात पैजारवाडी येथे झाला होता, त्यांना सदर अपघाताबाबत त्यांना कोणाचा तरी फोन आला होता, त्यांना फोन आल्यानंतर ते अपघाताच्या ठिकाणी गेले, तेथे ते गेले त्यावेळी त्यांचे भाउ यांना कोल्हापूर दवाखान्यात नेण्यात आले होते, डॉक्टरांनी सांगितले की, तुमच्या भावाला मेंदूला मार लागला आहे, डॉक्टरांनी ऑपरेशन केले, त्यांच्या भावाचे निधन झाले, सदर अपघात डॉक्टरांनी गाडीवरून पडल्यामुळे झाला व त्यामुळे मृत्यू झाल्याचे सांगितले, सदर ठिकाणी ते पोहोचल्यानंतर अपघात कसा झाला याबाबत त्यांना आठवत नाही. सदर फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंती वरुन त्यांना उलटप्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु फिर्यादीने अभियोग पक्षाचे कथन फेटाळून लावले. तसेच त्यांनी फिर्यादी व प्रथमवर्दीवरील सही ओळखली. तसेच त्याने आरोपी व त्याचेमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले. तसेच त्याबाबतची पुरसीस देखील दाखल केल्याचे त्याने मान्य केले. सदर फिर्यादी साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला. सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केलेल्या बाबींचे विवेचन करून आरोपी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांचा भाउ पांडुरंग याचा अपघात झाल्याबाबत त्यांना प्रत्यक्ष माहिती नाही, ज्यावेळी ते दवाखान्यात गेले त्यावेळी त्यांना ऐकीव माहितीवरून त्यांचा भाऊ आरोपीसोबत गेला होता असे कळले, ज्यावेळी त्यांचा पोलिसांनी जबाब नोंदविला त्यावेळी पोलिसांनी नोंदविलेल्या जबाबावर त्यांनी सही केली, सरतपासात दाखविलेला जबाब त्यांनी त्यावेळी वाचलेला नव्हता, त्यांनी दिलेली फिर्याद ही फक्त दवाखान्यात समजलेल्या ऐकीव माहितीवर दिलेली

होती. तसेच सदर फिर्यादीने त्याच्या उलटतपासात हे मान्य केले की, आरोपीचे व त्यांचेमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झालेली आहे, तशी तडजोड पुरसीस व अर्ज त्यांनी न्यायालयात दाखल केलेला आहे, सदर आरोपीविरुद्ध आता त्यांची कोणतीही तक्रार नाही.

०७. सदर कामी सरकार पक्षातर्फे साक्षीदार नामदेव खुटाळे यांचा जबाब नि. ३० येथे नोंदविण्यात आला. सदर साक्षीदार प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. सदर साक्षीदार याने सरतपासात पांडुरंग गणपती खुटाळे हे त्यांच्या भावकीतील असून ते त्यांना ओळखत होते, सदरची घटना घटना कधी तसेच कोणत्या तारखेला घडली होती ते त्यांना आठवत नाही असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंती वरुन साक्षीदाराला उलटप्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. त्यामध्ये सदर साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, पांडुरंग हे दवाखान्यात मयत झाले, परंतु सदरचा अपघात हा आरोपी याच्या चुकीने झाला होता किंवा कसे हे त्यांना सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे. तसेच आरोपी हा त्यांच्या चांगल्या ओळखीचा असल्याचे त्यांना शिक्षा व्हावी असे त्यांना वाटत नाही असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपी तर्फे उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये सदर साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, आरोपी हा त्यांचा गावचा आहे, त्यांना न्यायालयात आल्यानंतर आरोपीला पाहिले त्यावेळी आरोपीच्या खटल्यात त्यांना साक्ष द्यायची आहे असे समजून आले, पोलिसांनी त्यांच्या जबाबात काय लिहीले त्याबाबत त्यांना माहिती नाही असे कथन केले आहे.

०८. सदर कामी सरकार पक्षातर्फे साक्षीदार सागर पवार यांचा जबाब नि.३२ येथे नोंदविण्यात आला. सदर साक्षीदार हा तपासिक अधिकारी असून सदर साक्षीदाराने सरकार पक्षास पुरक अशीच साक्ष दिलेली आहे. मात्र सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला त्यामध्ये त्याने मान्य केलेल्या बाबींचे विवेचन करून आरोपी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, सदर साक्षीदाराने त्यांच्या माहितीनुसार अपघात दि. १६.०६.२०२१ रोजी झाला होता व त्याची फिर्याद ही दि. २२.०६.२०२१ रोजी दाखल झाली होती. सदर साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, सदर फिर्याद दाखल होण्यास विलंबत का झाला

याबाबतचा तपास त्यांनी केलेला नव्हता, तपास त्यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी घटनास्थळाला भेट दिली होती, ते घटनास्थळी गेले त्यावेळी मोटरसायकल घसरल्याच्या खुन्हा त्यांनी पाहिल्या नव्हत्या, सदर घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत किंवा कसे हे त्यांना आठवत नाही असे कथन केले आहे. तसेच सदर साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, या कामी आर. टी. ओ यांचेकडून आलेला अहवाल त्यांनी पाहिलेला होता, या कामी असलेल्या अपघातग्रस्त वाहनाचा ब्रेक फेल झाला होता किंवा कसे आणि टायर फेल झाला होता किंवा कसे हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले नव्हते, अपघातातील गाडीचा वेग जास्त होता याबाबतची खात्री त्यांनी केली नाही, त्यांनी अपघातस्थळावरून हेल्मेट वगैरे जप्त केलेले नाही, त्यांनी या प्रकरणात कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही.

०९. साक्षीदार जालिंदर (अ.सा.क्र.१) फिर्यादी यांनी त्यांच्या जबाबात तडजोड झाल्याचे त्यांनी मान्य केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे साक्षीदारांच्या जबाबात देखील आरोपीविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा पूर्णपणे अभिलेखावर आला असे म्हणता येणारे नाही. तसेच केवळ तपासिक अंमलदार यांनी सरकार पक्षास पुरक साक्ष दिलेली असली तरी देखील सदरची घटना ही नेमकी कशी घडली होती हे कोणत्याही प्रकारे समजून येत नाही. तसेच केवळ तपासिक अंमलदार यांच्या साक्षीवर विसंबून राहून आरोपी यास दोषी धरता येणारे नाही. तसेच यातील मुळ फिर्यादी व आरोपीची न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली असल्याचे फिर्यादी याने मान्य केले आहे. दोषसिध्दीचे मुख्य घटक म्हणजे मृत्यू, अपघात व गंभीर दुखापत हे सिध्द होत नाहीत.

१०. प्रस्तुत प्रकरणात मयत पांडुरंग यांच्या सोबत घडलेल्या घटनेबद्दल आरोपीला संशयापलिकडे दोषी धरणे योग्य नाही. सबब आरोपीला दोषारोपीत कलमांप्रमाणे आरोपाखाली सिद्धदोषी धरणे न्यायोचीत होत नाही असे वाटते. सबब मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र.६ बाबत:-</u>**

११. प्रस्तुत प्रकरणात मुळ फिर्यादी व आरोपी यांचे मध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे फिर्यादीच्या उलटतपासातून तसेच फिर्यादी व आरोपीने निशाणी १९ वर दाखल

केलेल्या आपसात तडजोड पुरसीसवरुन दिसून येते. आरोपी व फिर्यादी यांचे दरम्यान झालेली तडजोड तसेच त्यांचेमधील वाद आपसात मिटलेला असल्यामुळे फिर्यादी याने खोटा साक्षी पुरावा दिला असे म्हणत त्याच्या विरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० किंवा ३४४ अन्वये कार्यवाही करणे योग्य होणार नाही. तसेच तशी अभियोग पक्षातर्फे मागणी देखील अभिलेखावर नाही. आरोपीला दोषी धरण्याइतपत पुरेसा पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे आरोपीला प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करणेत येत आहे. सबब, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्र.६ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

**१. आरोपी संजय दादू खोत याची भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४-अ, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणेच्या अपराधामधून फौजदारी प्रक्रिया संहितचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.**

**२. आरोपी याचे जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहेत.**

**३. आरोपी याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी रु. १५,०००/- (रक्कम रुपये पंधरा हजार फक्त) चा वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र सादर करावेत.**

**(खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आले.)**

27/8/26.

दिनांक : २७.०८.२०२६
ठिकाण : पन्हाळा.

**के. दि. काकतकर**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा.